## बेभरवशी पंजाब किंग्जविरुद्ध आज लढत

# चेन्नईची प्ले-ऑफसाठी झुंज

**धरमशाला :** गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्जला यंदाच्या मोसमात अपेक्षेप्रमाणे सूर गवसलेला नाही. १० सामन्यांत ५ पराभवांसह चेन्नईची गाडी १० गुणांनिशी पाचव्या स्थानी अडली आहे. त्यामुळे प्ले-ऑफ फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी त्यांना आता पुढील चार सामन्यांत निकराची झुंज द्यावी लागणार आहे. त्यातच बेभरवशी कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या पंजाब किंग्जविरुद्ध त्यांचा सामना रविवारी रंगणार आहे.

तीन दिवसांपूर्वी पंजाब किंग्जने चेन्नई सुपर किंग्जला त्यांच्याच मैदानावर सात विकेट्सनी धूळ चारली. घरच्या मैदानावर रंगलेल्या गेल्या तीनपैकी दोन सामन्यांत चेन्नईला पराभव पत्करावा लागल्याने पाच वेळा आयपीएलचे जेतेपद पटकावणाऱ्या चेन्नईचे प्ले-ऑफ फेरीतील स्थान धोक्यात आले आहे. मात्र पुढील चार सामन्यांत चेन्नईचे नशीब चमकते का, याची उत्सुकता सर्वांना आहे.

फिरकीपटू हरप्रीत ब्रार आणि राहुल चहर यांनी केलेल्या अप्रतिम गोलंदाजीमुळे चेन्नईला पंजाबविरुद्ध ७ बाग १६२ धावाच करता आल्या. चेन्नईची फलंदाजी अद्यापही कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि स्फोटक फलंदाज शिवम दुबे यांच्यावरच अवलंबून आहे. ते अपयशी ठरल्यास, चेन्नईची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली जाते. पंजाबविरुद्ध ऋतुराजने यंदाच्या मोसमातील पाचवे अर्धशतक झळकावले असले तरी त्यांना मोठी धावसंख्या रचता आली नाही. अनुभवी अजिंक्य रहाणे चांगली सुरुवात करून देण्यात पुन्हा एकदा अपयशी ठरला. तसेच रवींद्र जडेजा आणि समीर रिझवी फिरकीपटूंविरुद्ध चांगली कामगिरी करू शकले नाहीत.

चेन्नईचा संघ आरोग्य आणि खेळाडूंच्या फिटनेसमुळे चिंतेत आहे. वेगवान गोलंदाज दीपक चहरने अवघे दोन चेंडू टाकल्यावर मांडीचे स्नायू ताणले गेल्यामुळे पंजाबविरुद्धच्या सामन्यातून माघार घेतली. तसेच मथिशा पाथिराना (दुखापतग्रस्त) आणि तुषार देशपांडे (तापाने आजारी) यांच्या अनुपस्थितीचा फटका चेन्नईला बसत आहे. गेल्या सामन्यात रिचर्ड ग्लीसन याला आयपीएल पदार्पणाची संधी मिळाली, त्यामुळे या सामन्यात मुकेश चौधरीला संधी मिळू शकते.

पंजाब किंग्जने लागोपाठ दोन विजय मिळवून प्ले-ऑफच्या शर्यतीतील आपले आव्हान कायम राखले आहे. त्यामुळे पंजाबचा संघ ८ गुणांसह सातव्या स्थानी पोहोचला आहे. जॉनी बेअरस्टो याने कोलकाताविरुद्ध शतक झळकावले होते. रिली रोसू, शशांक सिंग आणि प्रभसिमरन सिंग यांच्याकडून पंजाबला चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. गोलंदाजीत कॅगिसो रबाडा, हर्षल पटेल, अर्शदीप सिंग आणि सॅम करण यांसारखे अनुभवी खेळाडू त्यांच्याकडे आहेत. मात्र त्यांच्या कामगिरीत सातत्य असण्याची गरज आहे. धरमशाला स्टेडियमवर २०१० साली चेन्नई आणि पंजाब यांच्यात पहिला सामना झाला होता, त्यावेळी धावांचा पाऊस पडला होता.



**प्रतिस्पर्धी संघ**

■ **चेन्नई सुपर किंग्ज :** ऋतुराज गायकवाड (कर्णधार), महेंद्रसिंह धोनी, मोईन अली, दीपक चहर, तुषार देशपांडे, शिवम दुबे, राजवर्धन हंगर्गेकर, रवींद्र जडेजा, अजय मंडल, मुकेश चौधरी, अजिंक्य रहाणे, शेख रशीद, मिचेल सँटनर, सिमरजीत सिंग, निशांत सिंधू, प्रशांत सोलंकी, महीष थिक्षणा, रचिन रवींद्र, शार्दूल ठाकूर, डॅरेल मिचेल, समीर रिझवी, मुस्तफिझूर रहमान, अरावेल्ली अविनाश, रिचर्ड ग्लीसन.

■ **पंजाब किंग्ज :** शिखर धवन (कर्णधार), जितेश शर्मा, जॉनी बेअरस्टो, प्रभसिमरन सिंग, लियाम लिव्हिंगस्टोन, हरप्रीत भाटिया, रायली रॉसो, शशांक सिंग, ख्रिस वोक्स, विश्वनाथ सिंग, आशुतोष शर्मा, तनय थ्यागराजन, अथर्व तायडे, ऋषी धवन, सॅम करन, सिकंदर रझा, शिवम सिंग, प्रिन्स चौधरी, हरप्रीत ब्रार, अर्शदीप सिंग, कगिसो रबाडा, नॅथन एलिस, राहुल चहर, विद्वत कॅव्हेरप्पा, हर्षल पटेल.

■ **वेळ :** दुपारी ३.३० वाजल्यापासून ■ **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स वाहिनी आणि जिओ सिनेमा ॲप

# लखनऊ-कोलकातामध्ये दुसऱ्या स्थानासाठी लढाई

**लखनऊ :** लखनऊ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांनी यंदाच्या मोसमात चांगली कामगिरी केली असून त्यांचा प्ले-ऑफ फेरीतील प्रवेश जवळपास निश्चित मानला जात आहे. त्यामुळे रविवारी होणाऱ्या या उभय संघांमधील लढतीत दुसऱ्या स्थानावर मजल मारण्याचे उद्दिष्ट असणारआहे.

वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सवर २४ धावांनी विजय मिळवून कोलकाताने १४ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. त्यामुळे प्ले-ऑफ फेरीतील प्रवेशापासून ते फक्त एक विजय दूर आहेत. तसेच लखनऊ सुपर जायंट्स १२ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याखालोखाल सनरायजर्स हैदराबाद, चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स हे संघही प्ले-ऑफच्या शर्यतीत असल्याने लखनऊवरील दडपण वाढले आहे. त्यामुळे कोलकातावर विजय मिळवून सरस धावगतीच्या आधारे दुसरे स्थान पटकावण्याचे त्यांचे ध्येय असेल.

गेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचे १४५ धावांचे आव्हान गाठताना लखनऊची दमछाक झाली. त्यातच शेवटच्या षटकांत चार विकेट्स शिल्लक राखून लखनऊने हे उद्दिष्ट पार केले. कर्णधार लोकेश राहुल आणि मार्कस स्टॉइनिस हे खेळाडू लखनौसाठी महत्त्वाचे असून दक्षिण आफ्रिकेच्या क्विंटन डीकॉकला सलामीला पुन्हा संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. लखनऊने डीकॉकला वगळून अर्शिन कुलकर्णीला सलामीला पाठवले. पण मुंबईविरुद्ध त्याला खातेही खोलता आले नाही.

आयुष बदोनीने सुरुवातीला चमक दाखवली, पण नंतर त्याला चांगली कामगिरी करता आलेली नाही. लखनऊच्या गोलंदाजांची कोलकाताविरुद्ध मात्र चांगलीच कसोटी लागणार आहे. लखनऊने सहा सामने जिंकले असले तरी त्यांच्या एकाही गोलंदाजाला वैयक्तिकरीत्या छाप पाडता आलेली नाही. त्यांचा वेगवान गोलंदाज मयांक यादव दुखापतीमुळे संघाबाहेर आहे.

कोलकाता नाइट रायडर्सची गोलंदाजी खराब होत असताना पंजाब किंग्जने आयपीएलमधील सर्वाधिक २६२ धावांचा यशस्वी पाठलाग केला. मात्र नंतरच्या दोन्ही सामन्यांत कोलकाताच्या गोलंदाजांनी छाप पाडली. यंदाच्या मोसमात कोलकाताची फलंदाजी दुसऱ्यांदा ढेपाळली. मुंबई इंडियन्सविरुद्ध त्यांची अवस्था ५ बाद ५७ अशी झाली असताना व्यंकटेश अय्यर आणि मनीष पांडे यांनी संघाची बाजू सावरली. अय्यर (७०) आणि पांडे (४२) यांनी केलेल्या ८३ धावांच्या भागीदारीमुळे कोलकाताला सन्मानजनक धावसंख्या उभारता आली. त्यानंतर गोलंदाजीत मिचेल स्टार्क, वरुण चक्रवर्ती, सुनील नरिन आणि आंद्रे रस्सेल यांनी छाप पाडली. स्टार्कने इशान किशनला बाद करत कोलकाताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर मुंबईची फलंदाजी कोलकाताविरुद्ध कोलमडत गेली. स्टार्कने चार विकेट्स मिळवत कोलकाताच्या विजयात मोलाची भूमिका निभावली.



**प्रतिस्पर्धी संघ**

■ **लखनऊ सुपर जायंट्स :** के. एल. राहुल (कर्णधार), क्विंटन डीकॉक, निकोलस पूरन, आयुष बदोनी, कायले मेयर्स, मार्कस स्टोइनिस, दीपक हुडा, देवदत्त पडिक्कल, रवी बिश्नोई, नवीन उल हक, कृणाल पंड्या, युधवीर सिंग, प्रेरक मंकड, यश ठाकूर, अमित मिश्रा, शामर जोसेफ, मयांक यादव, मोहसिन खान, के. गौतम, अर्शीन कुलकर्णी, एम. सिद्धार्थ, ॲश्टन टर्नर, डेव्हिड विली, अर्शद खान, मॅट हेन्री.

■ **कोलकाता नाइट रायडर्स :** श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव अरोरा, मिचेल स्टार्क, श्रीकर भरत, दुश्मंता चमीरा, हर्षित राणा, वेंकटेश अय्यर, मुजीब उर रहमान, सुनील नरिन, मनीष पांडे, अंक्रिश रघुवंशी, रहमनुल्ला गुरबाझ, रमणदीप सिंग, नितीश राणा, अनुकुल रॉय, आंद्रे रसेल, शर्फेन रुदरफोर्ड, चेतन साकरिया, सकिब हुसैन, फिल सॉल्ट, रिंकू सिंग, सुयश शर्मा, वरुण चक्रवर्ती.

■ **वेळ :** सायंकाळी ७.३० वाजल्यापासून ■ **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स वाहिनी आणि जिओ सिनेमा ॲप

## निवडक क्रीडा

### ठाणे वॉरियर्सचा विजय

**ठाणे :** सांघिक प्रयत्नांच्या जोरावर ठाणे वॉरियर्स क्रिकेट अकॅडमीने स्पोर्ट्समन क्रिकेट अकॅडमीचा सात विकेट्सनी पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्था आयोजित १२ व्या ठाणे प्रीमियर लीग टी २० क्रिकेट स्पर्धेत विजयी सुरुवात केली. गोलंदाजांनी स्पोर्ट्समन क्रिकेट क्लबला १२९ धावांवर रोखल्यावर फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी करत ११.२ षटकात १३१ धावा करत ठाणे वॉरियर्स क्रिकेट अकॅडमीने विजय निश्चित केला. अजित यादवने १५ चेंडूत ५ षटकार ठोकत विजयाचे लक्ष्य गाठून देण्यात मोलाची भूमिका बजावली. रमणप्रीत सिंगने ३३, ओम केशकामतने नाबाद ३१ आणि संवेद व्यवहारेने नाबाद ११ धावांची खेळी केली.

### एमआयजी क्लब अंतिम फेरीत

**मुंबई :** भामा क्रिकेट क्लब आयोजित १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत एमआयजी क्रिकेट क्लबने अंतिम फेरीत प्रवेश केला. वांद्रे येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात फोर्ट विजय क्रिकेट क्लबने प्रथम फलंदाजी करताना ३४.३ षटकांत २०४ धावांची मजल मारली. शिवम गुप्ताचे (५७) अर्धशतक तसेच हिमांशू सिंगच्या ३९ धावांमुळे त्यांना द्विशतकी मजल मारता आली. हे आव्हान एमआयजीने ३१.५ षटकांत ४ विकेट्सच्या मोबदल्यात पार केले. हृदय मेहताने ८९, आदित्य बळीवाडाने ६९ धावांची चमकदार खेळी करत विजयात मोलाचा वाटा उचलला. अंतिम फेरीत एमआयजी क्रिकेट क्लबची गाठ गावदेवी क्रिकेटर्सशी पडेल. उपांत्य फेरीतील पहिल्या सामन्यात त्यांनी व्हिक्टरी सीसीवर ४९ धावांनी मात केली.

## मावळी मंडळ कबड्डी स्पर्धा आजपासून

**ठाणे :** श्री मावळी मंडळ संस्थेच्या वतीने ७१व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा राज्यस्तरीय पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा रविवार ५ मेपासून सुरू होत आहे. स्पर्धेचे उदघाटन विनयकुमार राठोड (पोलीस उपायुक्त ठाणे वाहतूक विभाग) यांच्या हस्ते होणार आहे. पुरुष गटात ६२ तर महिला गटात ३० संघानी सहभाग घेतला आहे. पुरुषांमध्ये, गुडमॉर्निंग स्पोर्ट्स क्लब (मुंबई शहर), बंड्या मारुती सेवा मंडळ (मुंबई शहर), स्वस्तिक क्रीडा मंडळ (मुंबई उपनगर), ईच्छाशक्ती क्रीडा मंडळ (पालघर), श्री साई स्पोर्ट्स (नाशिक), शिवशंकर क्रीडा मंडळ (ठाणे), मिडलाईन कर्जत (ठाणे), जय बजरंग क्रीडा मंडळ वाशिंद (ठाणे), जय बजरंग रोहा (रायगड) या नामवंत संघांचा समावेश आहे. तर, महिला गटात शिवशक्ती स्पोर्ट्स क्लब (धुळे), श्री राम कबड्डी संघ (पालघर), स्वराज्य स्पोर्ट्स अकॅडमी (चिपळूण), अमर हिंद मंडळ (मुंबई शहर), शिवतेज क्रीडा मंडळ (ठाणे), प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्ट्स फाऊंडेशन (पुणे) या संघांचा समावेश आहे.

## गुजरातला १४७ धावांवर रोखले

**बंगळुरू :** मोहम्मद सिराज, यश दयाल आणि विजयकुमार वैश्य यांच्या दमदार गोलंदाजीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने प्रथमच गोलंदाजीत चांगली कामगिरी करत गुजरात टायटन्सला १४७ धावांवर रोखले.

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा बंगळुरूचा निर्णय त्यांच्या गोलंदाजांनी सार्थ ठरवला. सिराजने सुरुवातीलाच दिलेल्या दोन धक्क्यामुळे गुजरातची अवस्था ३ बाद १९ अशी झाली होती. त्यानंतर शाहरूख खान (३७), डेव्हिड मिलर (३०) आणि राहुल तेवतिया (३५) यांनी दिलेल्या उपयुक्त योगदानामुळे गुजरातला शतकी पल्ला पार करता आला. मिलरला कॅमेरून ग्रीनच्या गोलंदाजीवर कर्ण शर्माने २३ धावांवर जीवदान दिले. मात्र या जीवदानाचा फायदा उठवण्यात त्याला अपयश आले.

तेवतियाने कर्ण शर्माच्या १६व्या षटकांत १८ धावा वसूल केल्या. पण तळाच्या फलंदाजांनी सपेशल निराशा केल्यामुळे गुजरातचा डाव १९.३ षटकांत १४७ धावांवर आटोपला.

### आयपीएल गुणतालिका

| संघ | सामने | जय | पराजय | गुण | धावगती |
|---|---|---|---|---|---|
| राजस्थान | १० | ८ | २ | १६ | ०.६२२ |
| कोलकाता | १० | ७ | ३ | १४ | १.०९८ |
| लखनऊ | १० | ६ | ४ | १२ | ०.०९४ |
| हैदराबाद | १० | ६ | ४ | १२ | ०.०७२ |
| चेन्नई | १० | ५ | ५ | १० | ०.६२७ |
| दिल्ली | ११ | ५ | ६ | १० | -०.४४२ |
| पंजाब | १० | ४ | ६ | ८ | -०.०६२ |
| गुजरात | १० | ४ | ६ | ८ | -१.११३ |
| मुंबई | ११ | ३ | ८ | ६ | -०.३५६ |
| बंगळुरू | १० | ३ | ७ | ६ | -०.४१५ |

(कोलकाता वि. मुंबई सामन्यापर्यंत)

# भारतीय संघाला दुखापतींचे ग्रहण

## सूर्यकुमार यादवनंतर रोहित शर्माही जायबंदी

**मुंबई :** यंदाच्या आयपीएलमध्ये अनेक दिग्गज खेळाडू जायबंदी होताना दिसत आहेत. त्यामुळे काही दिवसांनी टी-२० वर्ल्डकपसाठी अमेरिका आणि कॅरेबियन बेटांवर जाणाऱ्या भारतीय संघाची चिंता वाढली आहे. या स्पर्धेसाठी जाणारा संपूर्ण संघ १०० टक्के फिट नसल्याचे समजते. त्यात आता कर्णधार रोहित शर्माची भर पडली आहे.



कोलकाताविरुद्धच्या लढतीत मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माला मुख्य संघात स्थान देण्यात आले नव्हते. मात्र नंतर हार्दिक पंड्याने त्याला इम्पॅक्ट प्लेयर म्हणून मैदानावर उतरवले. रोहितच्या पाठीत चमक भरल्याचे पीयूष चावलाने सामना संपल्यानंतर सांगितले. फक्त रोहितच नव्हे तर भारतीय संघात निवड झालेल्यांपैकी अनेक खेळाडू तंदुरुस्त नसल्याचे समजते. जगातील सर्वोत्तम टी-२० खेळाडू समजल्या जाणाऱ्या सूर्यकुमार यादवलाही मुंबई इंडियन्सने पूर्ण संधी दिलेली नाही. तो १०० टक्के फिट नसल्यामुळेच त्याला अधूनमधून मैदानावर परतण्याची संधी देण्यात येते.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना सूर्यकुमारच्या घोट्याला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली, पण त्यानंतरही त्याला हार्नियाच्या शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले. शिवम दुबे हासुद्धा रणजी करंडकाच्या शेवटच्या टप्प्यात खेळू शकला नव्हता. चेन्नई सुपर किंग्जसाठी तो इम्पॅक्ट प्लेयरच्या नियमाप्रमाणे फिनिशरची भूमिका बजावत आहे. त्यामुळे तो गोलंदाजीसाठी उपलब्ध होत नाही. भारतीय संघाला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीची उणीव टी-२० वर्ल्डकपदरम्यान जाणवणार आहे.

## मयांक यादव उर्वरित आयपीएलला मुकणार

**लखनऊ :** पोटाला झालेल्या दुखापतीमुळे लखनऊ सुपर जायंट्सचा वेगवान गोलंदाज मयांक यादव उर्वरित आयपीएलला मुकणार असल्याचे संकेत मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर यांनी दिले आहेत. मयांकने ताशी १५० किमी वेगाने गोलंदाजी करत सर्वांनाच धक्का दिला होता. ७ एप्रिलला गुजरात टायटन्सविरुद्ध पदार्पण केल्यानंतर काही सामन्यांनंतर त्याला दुखापत झाली. त्यामुळे त्याला तीन सामन्यांमध्ये खेळता आले नाही. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने पुनरागमन केले, मात्र तो आपला चार षटकांचा कोटा पूर्ण करू शकला नाही. ३.१ षटके टाकल्यानंतर दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. पूर्वीच्या दुखापतीच्या जागीच त्याला जखम झाली आहे.

### कल्पेश कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेत वेदांत बने, अर्णव लाडचे प्रत्येकी ३ बळी

# भिवंडी केंद्राचा डाव ४७ धावांवर आटोपला

**मुंबई :** मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेखालील यंदाच्या मोसमातील अखेरच्या म्हणजेच कल्पेश कोळी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेला शनिवारपासून विविध केंद्रांवर सुरुवात झाली. त्यात वेदांत बने, अर्णव लाड यांच्या प्रत्येकी तीन विकेट्सच्या जोरावर बोरिवली केंद्राने भिवंडी केंद्राला अवघ्या ४७ धावांत गुंडाळले. त्यानंतर पहिल्या दिवसअखेर बोरिवली केंद्राने १ बाद २७७ धावा केल्या आहेत.

वेदांत, अर्णव यांना हृदय राणावत यानेही चांगली साथ दिली. हृदयनेही तीन विकेट्स मिळवले. त्यामुळे भिवंडी केंद्राचा डाव ४७ धावांवर गडगडला. त्यानंतर वेदांत निर्मल (८४), हृषीकेश नाईक (खेळत आहे ८७) आणि युग असोपा (खेळत आहे ७०) यांनी बोरिवली केंद्राला भक्कम स्थितीत आणून ठेवले. अ गटातील पहिल्या सामन्यात अनिश तांबेच्या पाच विकेट्समुळे पालघर केंद्राचा डाव १२९ धावांवर संपुष्टात आला. त्याला भूषण राठोडने तीन विकेट्स मिळवत चांगली साथ दिली. त्यानंतर कलिना केंद्राने दिवसअखेर ३ बाद ६४ धावा केल्या आहेत.

अन्य सामन्यांत, दहिसर केंद्राने माटुंगा केंद्राविरुद्ध खेळताना ९ बाद २२९ धावांवर आपला डाव घोषित केला. आरव मल्होत्रा ६८, प्रीतेश बेंगारी ३५ आणि अद्वैत भट नाबाद ३१ धावा यांच्या चमकदार फलंदाजीमुळे दहिसर केंद्राला चांगली मजल मारता आली. वांगणी केंद्राने मुलुंडविरुद्ध १८७ धावा केल्या. त्यात देवेन यादव (९२), वंश चुंबळे (४२), आकाश मांगडे (३६) यांचे मोलाचे योगदान होते.

दरम्यान, शनिवारी सकाळी भारतीय क्रिकेटपटू सर्फराज खान, पहिली महिला कसोटी पंच वृंदा राठी आणि मराठी कलाकार संजय मोने यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.



## सेठ-अरस उपांत्यपूर्व फेरीत

**मुंबई :** कॅमिल सेठ आणि महेश अरस जोडीने उपउपांत्यपूर्व फेरीच्या दुहेरीच्या सामन्यात अनुपकुमार शुक्ला आणि विपुल जे. पटेल जोडीचा ३०-१८ असा पराभव करत जी. डी. बिर्ला मेमोरियल मास्टर्स आंतरक्लब बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. बॉम्बे जिमखाना येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत शनिवारी आनंद विठ्ठलकर आणि प्रिया आंबेकर जोडीने अंतिम आठ जोड्यांमध्ये स्थान मिळवले. त्यांनी मानेक दारूवाला आणि राधारमणन पणिकर जोडीचा ३०-२३ असा पराभव केला.

